# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६०० / २६३३३३३० /२६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail: - dg@barti.in


जा.क्र.बार्टी/योजना विभाग/वेळापत्रक /२०२६-२०२७/५००७ दिनांक: १३/०८/२०२६

## घोषणापत्र

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी) पुणे मार्फत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीतील (मातंग व इतर तत्सम मांग, मातंग मिनिमादिग, दखनी- मांग, मांग-म्हशी, मदारी, गारुडी, राधेमांग, मांग गारोडी, मांग गारुडी, मादगी व मादिगा या जाती वगळून) उमेदवारांना बार्टी मार्फत जेईई (JEE) व नीट (NEET) परीक्षेचे पूर्व प्रशिक्षण देण्यात येत आहे. त्याअनुषंगाने पुणे, मुंबई, नाशिक, छ. संभाजीनगर, लातूर, अमरावती व नागपूर या ठिकाणी प्रत्येकी जेईई (JEE) प्रशिक्षणासाठी ७५ व नीट (NEET) प्रशिक्षणासाठी ७५ विद्यार्थ्यांची निवड करण्याकरिता बार्टी मार्फत दि. १४/०५/२०२६ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. सदर जाहिरातीद्वारे दिनांक ३०/०६/२०२६ पर्यंत ऑनलाईन अर्ज/ नोंदणी करण्याबाबत नमूद करण्यात आले होते. त्याअनुषंगाने विद्यार्थ्यांच्या प्राप्त ऑनलाईन माहितीच्या आधारे बार्टी मार्फत पुणे, मुंबई, नाशिक, छ. संभाजीनगर, लातूर, अमरावती व नागपूर या ठिकाणासाठी जेईई (JEE) व नीट (NEET) करिता तात्पुरती निवड यादी व प्रतीक्षा यादी दिनांक ०७/०८/२०२६ रोजी बार्टी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेले आहे.

प्रसिद्ध करण्यात आलेल्या तात्पुरत्या निवड व प्रतीक्षा यादीतील पुणे, मुंबई, नाशिक, छ.संभाजीनगर, लातूर, अमरावती व नागपूर या ७ विभागातील निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या मुळ कागदपत्रांची तपासणी **बार्टी येरवडा संकुल, ४, कॉमरझोन आयटी पार्क, अंतर्गत रोड, जेल रोड,येरवडा पुणे, महाराष्ट्र - ४११००६ येथे सकाळी १०:३०** वाजले पासून करण्यात येणार आहे. प्रशिक्षण ठिकाणानुसार कागदपत्रे तपासणी वेळापत्रक खालीलप्रमाणे.

| अनु क्र. | प्रशिक्षणाचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|
| १ | पुणे | १७/०८/२०२६ |
| २ | नाशिक | १८/०८/२०२६ |
| ३ | लातूर | १९/०८/२०२६ |
| ४ | छ.संभाजीनगर | २०/०८/२०२६ |
| ५ | अमरावती व नागपूर | २१/०८/२०२६ |
| ६ | मुंबई | २२/०८/२०२६ |

**विद्यार्थ्यांनी कागदपत्र तपासणी करिता खालीलप्रमाणे नमूद मूळ कागदपत्रासह उपस्थित राहावे.**

१. १० वी उत्तीर्ण गुणपत्रिका
२. रहिवासी दाखला
३. ३१ मार्च २०२७ पर्यंतचा वैध उत्पन्नाचा दाखला
४. जात प्रमाणपत्र
५. ११ वि विज्ञान शाखेत प्रवेश असल्याने बोनाफाईड

६. **बँक पासबुक (सुस्पष्ट प्रत/झेरॉक्स)**
७. **स्वाधार योजनेचा लाभ न घेतल्याचे स्वयंघोषणापत्र**
८. **बार्टी प्रतिज्ञापत्र** (प्रशिक्षणास पूर्ण वेळ उपस्थित राहण्याबाबत तसेच परीक्षा देणेबाबत ५०० रु. स्टॅम्प पेपर आणणे आवश्यक आहे) शपथ पत्राचा मसुदा सोबत जोडण्यात आला आहे.

**टिप :-**

१. ऑनलाईन अर्ज सादर करताना विद्यार्थ्यांनी JEE व NEET अशा दोन्ही प्रशिक्षणाकरिता अर्ज केलेले आहे. अशा विद्यार्थ्यांची निवड झाल्यास विद्यार्थ्यांनी कागदपत्रे तपासणी दरम्यान कोणत्याही एक प्रशिक्षणाची (JEE किंवा NEET) निवड करणे आवश्यक आहे.

स्वाक्षरी/-
( दीपा मुधोळ -मुंडे)
**महासंचालक**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था ( बार्टी ) पुणे**

# स्वयंघोषणापत्र

मी ------------------------------------------------------- रा.----------------------------------

इयत्ता------------मध्ये शिक्षण घेत आहे. माझी बार्टी मार्फत JEE/NEET प्रशिक्षणाकरीता ----------------- येथे निवड झालेली आहे. तरी मी सन २०२६-२७ या वर्षात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ घेतलेला आहे/नाही.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ घेतला असल्याचे आढळून आल्यास मी नियमानुसार कार्यवाहीस पात्र राहील करिता स्वयंघोषणापत्र लिहून देत आहे.

नाव------------------------------------

स्वाक्षरी--------------------------------

ठिकाण:

दिनांक:

# विद्यार्थ्यांसाठी शपथपत्र/प्रतिज्ञापत्र

मी________________________________पत्ता_______________________________

मोबाईल क्र.________________________असे शपथ पूर्वक लिहून देतो/देते की,

१. माझी जेईई / नीट प्रशिक्षणासाठी सन २०२६-२०२८ या वर्षाकरिता निवड झाली आहे.
२. मी या शपथपत्राद्वारे असे घोषित करतो/ करते कि मी सन २०२६-२०२८ या प्रशिक्षण कालावधीत पूर्णवेळ उपस्थित राहील, जर मी प्रशिक्षण कालावधीत सलग १० दिवसांपेक्षा जास्त दिवस अनुपस्थित राहिल्यास माझी निवड नियमानुसार रद्द करण्यात येईल.
३. मी जेईई/नीट सन २०२६-२०२८ या प्रशिक्षणाचा पूर्ण लाभ घेतल्यानंतर जेईई/नीट च्या परीक्षेसाठी बसलो/बसले नाही तर माझ्या प्रशिक्षणावर झालेला पूर्ण खर्च मला बार्टी संस्थेस परत करावा लागेल याची मला पूर्ण कल्पना आहे.
४. मी जेईई/नीट च्या प्रशिक्षणासाठी पूर्ण वेळ उपस्थित राहील, तसेच जेईई/नीट परीक्षा देणे बंधनकारक आहे हे मला मान्य आहे.

वरील मजकूर / माहिती सत्य असून मी स्वतः लिहून देत आहे.

शपथपत्र लिहून देणाऱ्याची सही :

शपथपत्र लिहून देणाऱ्याचे नाव :

सत्यापन

वरील सर्व मजकूर मी पूर्णपणे वाचला आहे व तो मला मान्य आहे. तथापि मी आज दि.    /    /२०२६ रोजी स्थळ ______________________ येथे प्रतिज्ञापत्रावर स्वाक्षरी करीत आहे.

आधार कार्ड क्र.